|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

**बातमी - १**

जळगाव १२ ( ) महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष विजय कांबळे व समिती सदस्यांनी गुरूवार दिनांक १२ एप्रिल रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला भेट देवून आढावा घेतला.

श्री.कांबळे यांच्या समवेत मधुकर गायकवाड (सदस्य सेवा), नरसिंग शेरखाने (सदस्य सचिव) आणि आयोगाचे जनसंपर्क अधिकारी रमेश शिंदे हे होते. प्रारंभी समितीने कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या बैठकीत कुलसचिव भ.भा.पाटील यांनी विद्यापीठाच्या एकंदर कामकाजाची तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरलेल्या पदांची माहिती दिली. याशिवाय विद्यापीठाकडून राबविल्या जाणाऱ्या विशेष योजनांची देखील माहिती दिली. आदिवासी भागात बालविवाह रोखण्यासाठी तसेच कुपोषण व बालमृत्यु होवू नये यासाठी विद्यापीठाने काही उपक्रम राबवावेत तसेच विशेषतः नंदुरबार जिल्ह्यासाठी आदिवासींची संपूर्ण माहिती एकत्रित व्हावी यासाठी विकास सुचकांक तयार करण्याची सूचना श्री.कांबळे यांनी यावेळी बोलताना केली. आदिवासी मुलींच्या शिक्षणात अधिक वाढ होणे गरजेचे आहे अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठ मागासवर्गीय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी देखील यावेळी आयोगाची भेट घेवून काही मागण्या सादर केल्या. या बैठकीच्यावेळी विद्यापीठातील अधिकारी उपस्थित होते.

-------

**बातमी - २**

जळगाव १२ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात गुरूवार दिनांक १२ एप्रिल रोजी मेलडी गीतगायन ग्रुपच्या कलावंतांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपासून कबीर, गौतमबुध्द यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी विविध गीते सादर करून अवघे सभागृह मंत्रमुग्ध झाले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतर्फे महात्मा फुले - डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयती महोत्सवानिमित्त आज दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात महात्मा फुले- डॉ.बाबासाहेब आंबेडकर गीतगायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरूप्रा.पी.पी.माहुलीकर हे होते. यावेळी प्रा.म.सु.पगारे, डॉ.बी.डी.कऱ्हाड, प्रा.जे.बी.नाईक, डॉ.अनिल चिकाटे, एस. आर. गोहील, ए.एस.कोळी आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रा.माहुलीकर यांनी या भिमगीतांकडे मनोरंजन म्हणून न पाहता यातून बोध घेण्याचे आवाहन यावेळी केले.

**पान २ वर**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



मेलडी गीतगायन ग्रुपचे भालचंद्र सामुद्रे, सौ.संगीता सामुद्रे, चंद्रकांत इंगळे, कपील घुगे या गीतकारांनी माया पोरगा साहेब झाला, जगात गाजा वाजा भिमराव एकच राजा, भिमराज की बेटी मै तो जयभीम वाली हूँ, मना बाबा मुळे पोट भरतस वं लाजी लाजी जयभीम करतस वं, सुज्ञानाचा निर्मळ झरा भिमासारखा माणूस खरा, पैदा न होता ए मसिहा तो, वादळ वारा, परिश्रमान सुखाचा करून त्याग तुला भिमान बनावल वाघ , माझा समाज विकणार नाही, रथ समतेचा असा आणिला आदी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील गीते सादर केली. यावेळी मेलडी सुपर हिट ऑर्केस्ट्राचे मोहन तायडे, सुरेश साळुंखे, दीपक तायडे, युवराज सोनवणे, नितीन शिरसाठ, सुनील तायडे, वीरेंद्र तायडे यांनी साथ- संगीतासाठी सहकार्य केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रमेश शिंदे, राजू सोनवणे, अरूण सपकाळे, तुषार पाटील आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार भालचंद्र सामुद्रे यांनी केले. उद्या दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता दृकश्राव्य कक्षात रक्तदान शिबीर होणार असल्याची माहिती विचारधारा प्रशाळेच्या वतीने देण्यात आली.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. १२ एप्रिल, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**स्वाक्षरीत //--**

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी